दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● गुरुवार २ मे २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २५९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# वोट देणार त्यासोबत नोटही देणार!

## राडी सर्कल मधील ग्रामस्थांनी केला अशोक हिंगे यांना विजयी करण्याचा संकल्प

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

बीड लोकसभा निवडणूक वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांची ग्रामीण भागामध्ये दिवसेंदिवस क्रेझ वाढू लागली असून आता तर नागरिकांनी नोट बरोबर वोटही देणार! असा संकल्प करीत अशोक हिंगे पाटील यांना बीड लोकसभा निवडणुकीत विजयी करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. याची सुरुवात राडी सर्कलमधील ग्रामस्थांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मधील शिल्लक राहिलेली देणगी 21 हजार रुपये अशोक हिंगे पाटील यांना निवडणुकीसाठी देणगी म्हणून देऊन केली आहे. बीड लोकसभा निवडणुकीमध्ये दुरंगी लढत होणार असल्याच्या वल्गना केल्या जात असल्या तरी ही लोकसभा निवडणूक तिरंगी होणार असल्याचे आता नागरिकांमधून बोलले जात आहे. अशोक हिंगे पाटील यांची क्रेझ दिवसेंदिवस वाढत चालली असून नागरिकांनीच अशोक हिंगे पाटील यांना विजयी करण्यासाठी प्रचार सुरु केला असल्याचे चित्र सर्वत्र दिसू लागले आहे. याचाच एक भाग म्हणजे अशोक हिंगे पाटील हे अंबाजोगाई तालुक्यातील राडी सर्कल मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ध्वजारोहण करण्यासाठी गेले असता येथील ग्रामस्थांनी अशोक हिंगे पाटील यांचे जोरदार स्वागत करत अशोक हिंगे पाटील यांना निवडून देण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. वोट तर देणारच त्याबरोबरच नोटही देणार! असे म्हणत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती मधील शिल्लक राहिलेली देणगी रुपये 21,000/- अशोक हिंगे पाटील यांना निवडणूक देणगी म्हणून बहाल केली. यामुळे बीडची लोकसभा निवडणूक तिरंगी होणार हे निश्चित झाले आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे, युवा नेते अजय सरवदे, युवा तालुकाध्यक्ष अनिल कांबळे, जिल्हा सचिव अरुण बनसोडे, जिल्हा सचिव परमेश्वर लांडगे, शहराध्यक्ष अमोल हातागळे, जिल्हा उपाध्यक्ष अस्लम पठाण, प्रसिद्धी प्रमुख अविनाश घणघावं, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अजय वाघमारे, तालुका उपाध्यक्ष प्रदीप वाघमारे, तालुकाध्यक्ष खाजमिया पठाण, सरपंच प्रशांत गंगणे, उपसरपंच नीलकंठ गंगणे, बबरुवान बनसोडे, सदस्य उमेश गंगणे, नितीन वाघमारे, सिद्धार्थ बनसोडे, बाळासाहेब गंगणे आदी उपस्थित होते.





आज महाराष्ट्र दिनानिमित्त साने गुरुजी निवासी प्रा.मा उच्च माध्यमिक विद्यालय, केज लोकसभा निवडणूक 2024 बंदोबस्त करिता आलेले सि.आय.एस.एफ.तुकडीचे डि.वाय.एस.पी.श्री.सतबीरसिंह यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले या प्रसंगी उपस्थित संस्थेचे अध्यक्ष एड.उद्धवराव कराड साहेब, उपाध्यक्ष राजेश कापसे, प्राचार्या डॉ. कविताताई कराड मॅडम व सि.आर.एफ.चे जवान,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी

## पोलीस हेमंत वाघमारे यांना पोलीस महासंचालक पदक केला उत्कृष्टसेवेबद्दल सन्मान

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर/विश्वास चोपडे**

सोलापूर जिल्ह्यातील पोलीस दलातील हेमंत वाघमारे यांना त्यांच्या उल्लेखनीय व प्रशंसनीय सेवा केल्याबद्दल पोलीस महासंचालक पदक देऊन १ मे २०२४ रोजी सोलापूर पोलीस मुख्यालय येथे त्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरवीत करण्यात आले. हेमंत वाघमारे हे मूळचे कव्हे ता.माढा येथील महाराष्ट्र पोलीस विभागात विविध प्रकारच्या प्रवर्गामध्ये केलेल्या उत्तम कामगिरीबद्दल आणि उल्लेखनीय प्रशंसनीय सेवेबद्दल हे पदक त्यांना मिळाले. हेमंत वाघमारे हे १० नोव्हेंबर २००८ रोजी पोलीस सेवेत भरती झाले त्यांना १७८ बक्षीस मिळाले आहेत. हेमंत वाघमारे हे सोलापूर शहर पोलीस दलात सध्या कार्यरत आहेत. त्यांना त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल व पदक मिळाल्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## अंबाजोगाई येथे अशोक हिंगे पाटील यांच्या प्रचारार्थ ॲड. प्रकाश आंबेडकर यांची ३ मे रोजी जाहीर सभा

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

बीड लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला आहे. वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या प्रचारार्थ ऍड.बाळासाहेब उर्फ प्रकाश आंबेडकर यांची दि.३ मे रोजी जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती पत्रकार परिषदेत दिली. वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ऍड.बाळासाहेब उर्फ प्रकाश आंबेडकर हे बीड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. दि. २ मे रोजी बीड मध्ये मुक्कामी येणार असून त्यांची अंबाजोगाई शहरात दि. ३ मे रोजी सायंकाळी ५ वाजता जाहीर सभा होणार आहे. अशोक हिंगे यांनी उमेदवारी जाहीर झाल्यापासून संपूर्ण बीड जिल्हा पिंजून काढला असून ठीक ठिकाणी बैठका घेतल्या जात आहेत. मागच्या लोकसभेला आंबेडकरांची अंबाजोगाई शहरात जाहीर सभा झाली होती. वंचित बहुजन आघाडीला सर्वाधिक मतदान याच तालुक्यातून पडले होते. गेल्या लोकसभेचे उमेदवार प्रा. विष्णू जाधव यांना लोकसभा निवडणुकीत ९२ हजार २३९ इतके मते मिळाली होती. तर सर्वाधिक केज व परळी मतदारसंघात मते मिळाली होती. महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे ह्या ओबीसी आहेत तर महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे मराठा कुणबी आहेत. त्याच बरोबर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील हे देखील कुणबी मराठा आहेत. बीड जिल्ह्यात मराठा समाजाचे मतदान हे निर्णायक ठरू शकणार आहेत. यामुळे येणाऱ्या काळात मतदार कोणाच्या बाजूने कौल देणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.



### संपादकीय

## "शिक्षण_आणि_लक्ष्मण"

(वृक्षमित्र विष्णू वाघ)

महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही" शिकलं तर अन्यायाविरुद्ध माणूस लढू शकतो, गरिबीची दरी कमी करू शकतो, मान सन्मानाने राहू शकतो, पोटाला पोटभर अन्न खाऊ शकतो, वाचता लिहिता आले तर जगभर कुठेही फिरू शकतो, शिक्षणाचे महत्त्व हळूहळू समजत होते. तो काळ होता स्वातंत्र्यानंतरचा, देशाचं मोजक उत्पन्न, संसाधनांची कमतरता आणि दारिद्र्याचे प्रमाण यामुळे बऱ्याच कुटुंबामध्ये अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा देखील भागवल्या जात नव्हत्या.....घरात खायला काही नाही, राहायला उसाचे पाचट टाकलेले सपार, सपरामध्ये थाटलेला संसार आणि सोबतीला असलेलं दारिद्र्य त्यातच चूल आणि मुलंही राहत होते.

साधारणपणे 1927 च्या आसपास नांदूरशिंगोटे ता. सिन्नर येथे शेळके (खेलनाव- वाळके - त्याकाळी शेतात वाळकं खूप पिकत होती म्हणून हे नाव पडले असावे) कुटुंबात जन्म झाला होता, आई-वडिलांनी नाव ठेवले होते लक्ष्मण. लक्ष्मण आणि एकनाथ हे दोघे भाऊ होते. दोन्ही भाऊ उपजिविकेसाठी साधारणपणे 150 वर्षांपूर्वी नांदूर शिंगोटे येथून दोडी बु ll येथे स्थलांतरित झाले, लक्ष्मण आणि त्यांची पत्नी हिराबाई यांचा गोठ्यामाळावरती छोट्याशा सपरात संसार सुरु होता, त्यांना पाच मुले व चार मुली झाल्या, किसन, निवृत्ती, दत्तू, नामदेव, विठ्ठल हे पाच मुले तर हौसाबाई, जिजाबाई, रेखाताई व अलका या चार मुली, एकूण नऊ अपत्य होती, एवढ्या मुलांना सांभाळणे काही साधी सोपी गोष्ट नव्हती, हातावर चालणारा संसार त्यात घरात दर शुक्रवारी बाजार आणायचा आणि तो हप्ताभर पुरवायचा, प्रचंड गरिबी पण एवढं असूनही लक्ष्मणाने मनाशी ठामपणे ठरवले होते आपल्या मुलांना शिकवायचे, मोठी दोन मुले शेती करू लागले आणि इतर तीन मुलं मात्र शिकू लागले शिक्षण काही सहजासहजी होण शक्य नव्हते घरात पैसाच नव्हता पण शिकायचं... शिकायचं... असं ठामपणे ठरले होते. तीन नंबरचा मुलगा दत्तू शाळेत जात होता, पायाला चप्पल नव्हती, शाळेत असताना त्याचे कपडे फाटलेले होते, दत्तू स्वभावाने शांत होता पण अभ्यासात मात्र खूपच हुशार होता, वर्गात पहिला क्रमांक पटकावत होता, त्याने दहावीपर्यंत शिक्षण ब्रह्मनंद हायस्कूल दोडी येथे घेतले, अकरावी बारावी विज्ञान शाखेत संगमनेर येथे केले, बारावीनंतर डॉक्टरच्या कोर्सला म्हणजे एमबीबीएसला नाशिक येथे आडगावला मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या मेडिकल कॉलेजला नंबर लागला, ग्रामीण भागातील क्वचितच मुले तेव्हा डॉक्टर होत होती, नंबर तर लागला प्रवेश घेतला शिक्षण सुरू झाले पण पैशाची मात्र गरज काही भागत नव्हती, खाजगी सावकाराकडून लक्ष्मण तात्याने कर्ज घेतले पण व्याज मात्र वाढतच गेले लक्ष्मण तात्याने गव्हाचे रान असलेल्या गव्हाळीतील पाच बिघे जमीन मुलांच्या शिक्षणासाठी विकली, तिन्ही मुलांचे शिक्षण सुरू होते,

# विजय स्पोर्टसब ॲकडमी तर्फ उन्हाळी प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन संपन्न...

**वादळवार्ता/ केज**

दर वर्षी प्रमाणे याहि वर्षी विजय स्पोर्टस् ॲकडमीच्या वतीने केज शहर तथा तालुक्यातील क्रिडा विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी प्रशिक्षण शिबीराचे आयोजन केले असता आज रोजी स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या मैदानात थाटामध्ये शिबीराचे उद्घाटन संपन्न झाले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पत्रकार हनुमंत भोसले सर हे होते तर उद्घाटक म्हणून केज तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी लक्ष्मण बेडसकर तसेच प्रमुख पाहुणे म्हणुन पत्रकार हनुमंत सौदागर , प्राचार्य कोकिळ सर, प्रा. नेहरकर सर, दैनिक वादळ वार्ताचे संपादक अजय भांगे सर, अशोक गायकवाड ठोंबरे सर, राऊत सर तोंडसे सर, नेमटे सर, अशोक



मस्के सर, मुंडे सर, सौ. गुंड मॅडम हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अध्यक्ष तथा प्रमुख पाहुण्याचा स्वागताचा कार्यक्रम संपन्न झाला यानंतर मनोगतामध्ये गटशिक्षण अधिकारी लक्ष्मण बेडसकर यांनी तालुल्यातील तथा शहरातील क्रिडा विद्यार्थ्यांथान करिता सर्वतपरी मदत करणार असल्याचे म्हणाले यानंतर हनुमंत भोसले यांनी प्रत्येक शाळेला क्रिडा शिक्षक ,मैदान आहेत परंतु तासिका होत नाहीत त्यामुळे तासिका सुरु करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे म्हटले. या कायक्रमाचे प्रस्ताविक क्रीडा संयोजक विनोद गुंड सर यानी केले तसेच सुत्रसंचालन गिरी सर यानी तर आभार नामदेव मुंडे सरांनी मानले.

# भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जगाचे प्रेरणास्त्रो - डॉ हनुमंत सौदागर

## कळमआंबा येथे भीम जन्मोत्सव उत्साहात

**वादळवार्ता/ केज**

जगात जिथे -जिथे अन्याय अत्याचार होतात तिथे तिथे त्या शोषित वंचित लोकांचे लढाईचं बळ आणि प्रेरणा डॉ बाबासाहेब आंबेडकर होत जातात असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते कळंबआंबा येथील भिम जन्मोत्सव कार्यक्रमात व्याख्याते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच शशिकांत इंगळे,प्रा.डॉ बाबासाहेब हिरवे, इब्राहीम चाचा पठाण, उपसरपंच डिगांबर वाघमारे, रिपाई चे तालुकाध्यक्ष सुनिल हिरवे माजी सरपंच सतिश इंगळे,राजकुमार मुसळे विलास लोढे आदींची उपस्थिती होती. उपस्थितांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शासकीय सेवेत रुजू होत असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. डॉ बाबासाहेबांच्या जीवनावर विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. पुढे बोलताना डॉ सौदागर म्हणाले डॉ बाबासाहेबांचे विचार आत्मसात करुन समाजाची उन्नती होईल. शेतकरी ,उपेक्षित,वंचित,महिला सर्व घटकांसाठी केलेले कार्य त्याचे पैलू समजून घेतले पाहिजेत.विचारधन ही देणगी आहे. जयंती महोत्सवातून उद्याची पिढी चांगली घडली पाहिजे असे मत व्यक्त केले. प्रा डॉ हिरवे यांनी यावेळी विचार मांडले. विलास लोढे यांनी उर्जादायी विचार मांडले.




कार्यक्रम यशस्वीतेसाठी जयंती उत्सव कमिटीचे अध्यक्ष दुर्योधन हिरवे,उपाध्यक्ष धम्मानंद हिरवे,सचिव बालासाहेब घाडगे,रजनीश गायकवाड,सुंदर घाडगे,इंद्रजित घाडगे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवराज हिरवे यांनी केले तर आभार हिरवे यांनी मानले.

# महायुतीच्या उमेदवार सौ.सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी विराट जनसभा

वादळवार्ता/पुणे

पुणे जिल्ह्यातील बारामती लोकसभा मतदारसंघातील भोर येथे महायुतीच्या उमेदवार सौ.सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी विराट जनसभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत भोरमधील नागरिकांना सर्वांगीण विकासासाठी महायुतीला मतदान करण्याचे आवाहन केले. आपल्या सरकारने महिलांचा सन्मान वाढवणारे अनेक निर्णय घेतले. आजपासून माता भगिनींशी संबधित एका ऐतिहासिक निर्णयाची राज्यात अंमलबजावणी सुरु झाली. शासकीय कागदपत्रांमध्ये व्यक्तीच्या नावात आधी आईचे नाव नंतर वडीलांचे नाव लावले जाणार आहे. आपले सरकार मुलगी, सून, पत्नी असा कोणताही भेदभाव करत नाही असे मत यावेळी व्यक्त केले. ही निवडणूक नात्यागोत्याची किंवा परिवारवादाची नसून ही निवडणूक मोदीजींना पुन्हा पंतप्रधान करण्याची आहे. काही लोकं निवडणुकीला परिवारवादाचा रंग देण्याचा प्रयत्न करतील. मात्र त्यांच्या भुलथापांना बळी पडू नका, असे आवाहन याप्रसंगी केले. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना मराठा



समजाला आरक्षण दिले. ते हायकोर्टामध्ये टिकले, परंतु महाविकास आघाडी सरकारच्या काळात सुप्रीम कोर्टामध्ये आरक्षण रद्द झाले. आपले सरकार जे होणार असेल तेच बोलणारे आहे, जे होणार नाही ते बोलणार नाही. खोटी आश्वासन आपण कधी दिली नाही आणि देणार नाही. मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत हायकोर्टाने आक्षेपाची याचिका फेटाळली असून पुढे कोर्टात हे आरक्षण नक्की टिकेल, असा विश्वास यासमयी व्यक्त केला. यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, माजी मंत्री विजयबापू शिवतारे, पुणे जिल्हाप्रमुख रमेशबापू कोंडे तसेच भोर तालुक्यातील महायुतीचे सर्व स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री गजानन विजय ग्रंथाचा चार दिवसीय सामुदायीक पारायण सोहळ्याचे अंबाजोगाईत अयोजन

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

येथील श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने गेली ११ वर्षापासु श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण,भक्ती संगीत, किर्तने व पालखी उत्सवाचे अयोजन केले जाते. दि.३ मे ते ६ मे २०२४ दरम्यान पारायण सोहळ्याचे आयोजन श्री योगेश्वर मंदीर हॉल वरचा मजला येथे करण्यात आले आहे. या चार दिवसीय उत्सवात श्री गजानन महाराज विजय ग्रंथाचे पारायण,भक्ती संगीत, किर्तने व पालखी उत्सव सोहळा संपन्न होणार आहे. ह.भ.प.वै दत्तात्रय जोशी महाराज नळेगाव यांच्या आशीर्वादाने हभप श्री आनंद महाराज जोशी नळेगाव यांच्या प्रमुख उपस्थितीत येथील श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने गेल्या ११ वर्षापासु श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण,भक्ती संगीत, किर्तने व पालखी उत्सवाचे अयोजन केले जाते. दि. ३ मे ते ६ मे २०२४ दरम्यान पारायण सोहळ्याचे आयोजन श्री योगेश्वर मंदीर हॉल वरचा मजला अंबाजोगाई येथे करण्यात आले आहे. चैत्र कृ शु १० दि. ३ मे शुक्रवार रोजी पहाटे ४ वा मंगलध्वनीने सुरवात होणार असुन पहाटे ५ वा 'श्रींना' रुद्राभिषेक व आरती, सकाळी ७ ते १० श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण - अध्याय १ ते ७, दु ४ वा भक्तीसंगीत मातृस्वर संगीत विद्यालय व समुह अंबाजोगाई सायं ६.३० ते ८.३० नारदीय किर्तन ह.भ.प.लक्ष्मीप्रसाद बुवा पटवारी, माजलगाव यांचे सायं ६.३० ते ८.३० नारदीय किर्तन होणार आहे. दि. ४ मे शनिवार रोजी पहाटे ५ वा 'श्रींना' रुद्राभिषेक व आरती सकाळी ७ ते १० श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण अध्याय ८ ते १४ त्यानंतर आरती, दु ४ वा भक्तीसंगीत,स्वररंग संगीत विद्यालय - शैलेश पुराणिक,तालस्पर्श तबला अकादमी - रत्नदिप शिंगे व पोस्टमास्तर भागवत पाठक यांची बासरी वादन होणार आसुनसायं ६.३० ते ८.३० नारदीय किर्तन ह.भ.प. बाळु बुवा नाव्हेकर गंगाखेड यांचे होणार आहे. दि. ५ मे रविवार रोजी पहाटे रुद्राभिषेक व आरती सकाळी ७ ते १० अध्याय १५ ते २१ त्यानंतर ग्रंथपुजन, ग्रंथदिंडी, पारायणारती , सायंकाळी ६ वाजता श्री गजानन महाराजांचा पालखी उत्सव सोहळा श्री योगेश्वरी मंदीर - मंडी बाजार - पाटील चौक , कुंभार गल्ली - श्रीगणेश साई मंदीर - मंगळवारपेठ - गुरवारपेठ मार्गे श्री योगेश्वरी मंदीरात येणार आहे. दि. ६ मे २०२४ पहाटे रुद्राभिषेक व आरती, सकाळी १० वा काल्याचे किर्तन : ह.भ.प. श्री शाम महाराज नेरकर (शास्त्री) त्यानंतर महाआरती व महाप्रसाद सायं ७ वा श्रींचा श्री संत गजानन महाराज भक्त मंडळ अंबाजोगाई संचलित, 'सत्संग श्री गजाननाचा' व "श्रींची" दिपोत्सवात शेजारती होऊन कार्यकमाची सांगता श्री योगेश्वर मंदीर हॉल येथे होणार आसुन भावीक भक्तांनी याचा लाभ घेण्याचे अवाहान श्री संत गजानन महाराज भक्त मंडळ अंबाजोगाई यांच्या च्या वतीने करण्यात आले आहे. तरी सर्व भावीक भक्तांनी याचा लाभ घेण्याचे अवाहान भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



## अखेर नाशिकच्या जागेचा तिढा सुटला हेमंत गोडसे यांना लोकसभेची उमेदवारी जाहीर

**दैनिक वादळ वार्ता**
**नाशिक/सुरेश इंगळे**



संपूर्ण राज्याचे लक्ष लावून असलेल्या नाशिक लोकसभेच्या जागेचा तिढा अखेर सुटला आहे. नाशिकच्या जागेसाठी (शिंदे गट) पक्षाचे विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांच्या नावाची घोषणा ( दि. १) करण्यात आली. त्यामुळे लोकसभा निवडणूक २०२४ साठी नाशिक मतदार संघातून हेमंत गोडसे हे महायुतीचे अधिकृत उमेदवार असणार आहेत , महायुतीकडून भाजप शिवसेना व राष्ट्रवादी कॉंग्रेस या तीनही पक्षाकडून या जागेवर दावा करण्यात येत होता , परंतु गोडसे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. छगन भुजबळ यांनी माघार घेतल्यामुळे गोडसे यांचा फायदा झाला , त्यामुळे गोडसे हे चौथांदा नाशिक लोकसभेच्या रिंगणात उतरले आहेत . तर , महाविकास आघाडी कडून या जागेवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे) राजाभाऊ वाजे यांचे नाव जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे राजाभाऊ वाजे विरुद्ध हेमंत गोडसे असी खूप मोठी चुरस नाशिक मध्ये होणार असून संपूर्ण राज्याचे लक्ष या लढतीकडे असणार आहे.

## महाविकासचे उमेदवार बजरंग सोनवणे या प्रचारात पाटोदा शिवसेना मैदानात



**वादळवार्ता/पाटोदा**

महाविकास आघाडीचे घटक पक्ष शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सह तालुका प्रमुख जिल्हा प्रमुख मुकुंद शिंदे व असंख्य कार्यकर्ते यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ मैदानात उतरले आहेत

याचवेळी पाटोदा शिवसेना ठाकरे गट चे विस्तारीकरण करण्यात आले यावेळी शिवसेना. जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते व तालुका प्रमुख मुकुंद शिंदे यांचा मार्गदर्शन खाली पदाधिकारी निवडी करण्यात येऊन त्यांना निवडीचे पत्र देण्यात आले

लोकसभा निवडणु1क महाविकास आघाडी चे उमेदवार बजरंग बप्पा याचा प्रचार साठी पदाधिकारी बेठक झाली सर्व शिवसैनिक नी बजरंग बप्पा प्रचार कामाला लागून निवडून आणायचे या साठी पूर्ण ताकतीने कामा ला लागले आहेत या वेळी महिला आघाडी तालुका प्रमुख प्रतिभा वणवे व युवासेना शहर प्रमुख अजिंक्य डोरले, शिवसेना उप तालुका अशोक पवार, उप सोमीनाथ लवुल, सचिन वणवे, अनिल ताबे, अल्पसंखक सेल तालुका प्रमुख लालू शाहा, शेतकरी सेना तालुका प्रमुख रामेश्वर नागरभोजे, तालुका संघटक सुधाकर घोशीर विभाग प्रमुख, संतोष ताबे , केलस काशीद, सतीश शिंदे, संतोष गाचाडे, विशाल शिंदे, माधव डोरले, हनुमंत वणवे, सर्व शिवसैनिक व युवासेना व महिला आघाडी उपस्थित होते

## गागलेगांव येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा संपन्न.

**वादळवार्ता/बिलोली**

नांदेडच्या बिलोली तालुक्यातील गागलेगांव येथे खंडोबा मंदिर मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा संपन्न झाला आज दिनांक 1 मे रोजी खंडोबा मंदिर मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा संपन्न झाला व चालत असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता ह.भ.प किशोर महाराज कोकाटे आंळदी देवाची यांच्या काल्याच्या किर्तन व भव्य महाप्रसादाने सांगता झाली या कार्यक्रमानिमित्त नांदेड जिल्ह्यातील वाघे वारु संत महंत किर्तनकार प्रवचनकार टाळकरी माळकरी वारकरी यांच्यासह गावातील बाई लेकी मोठ्या संख्येने उपस्थित होते हनुमंत चंदनकर नांदेड



# संविधान बचाव, राष्ट्र बचाव अंतर्गत बीड येचे ४ मे रोजी बुद्धीजीवी वर्ग, सामाजिक संघटनाची बैठक

**वादळवार्ता/बीड**

"संविधान बचाव, राष्ट्र बचाव अंतर्गत बीड येथे 4 में 2024 रोजी सोय ०5:00वा.निलकमल होटेल सभागृह येथे सर्व बुद्धीपीवी वर्ग, सहित्यीक, लेखक, विद्यार्थीसंघटना व सामाजिक संघटनाच्या प्रतिनिधीची बैठक आयोजित करण्यात आली आहे, तरी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सविधान रक्षकानी केले आहे. प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, गेली दहा वर्षात लोकशाहीच्या नावा खाली बहुमताच्या जोरावर देशात अद्योषीत हुकुमशाही सुरु आहे, सरकारचा विरोधात राष्ट्रहितासाठी, जनतेचा प्रश्नावर आवाज उठवला तर सरकारी एजन्सीचा दुरुपयोग करून विरोधकाचा आवाज दाबला जात आहे, लोकशाहीचे चार स्तंभ गुलाम करून ठेवण्यात आले आहे. त्यामुळे लोकशाहीला धोका निर्माण झालेल आहे, त्यामुळे लोकशाही व्यवस्था उलथाउन टाकण्यासाठी सविधान बदलल्याचे षडयंत्र सुरु आहे, तर या निवडनुकीत जातीयवादी पक्षाला बहुमत मिळाले तर, संविधान बदलले जाऊ शकते. आमच्या सारख्या बुद्धीजीवी सामजिक कार्यकत्या समोर देश जळत असताना आम्ही शांत राहणे हे राष्ट्रहितासाठी घातक आहे. सविधान वाचवुन लोकशाही बळकट करण्यासाठी एक दिलाने काम करावे लागेल व संविधान विरोधी शक्तीला पराभूत करावे लागेल तरच सामान्य जनतेचे अधिकार आबाधित राहतील, यावर विचारविनिमय करून निर्णय घेण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे, तरी बहुसंख्येने या बैठकी उपस्थित रहावे असे आवाहन संविधान रक्षकानी केले आहे.

# पाटोदा तालुक्यातील शेतक-यांचा मताचा पाऊस शेतकरीपुत्रावर पडणार-गणेश कवडे


**वादळवार्ता/पाटोदा**

पाटोदा तालुक्यातील शेतकरी इंडिया महाविकास आघाडीच्या बाजूने मत करणार असे शेतकरी नेते गणेश कवडे यांनी आपल्या प्रसिद्धी पत्रकार द्वारे सांगितले . भाजप सरकारच्या काळामध्ये शेतकरी आर्थिक दृष्ट्या पूर्णपणे खचला आहे खताचे भाव गगनाला पोहोचले परंतु मालाचे भाव कमी करून शेतकऱ्यावर एक प्रकारे अन्याय केला कांदा या पिकाला निर्यात बंदी केली, सोयाबीनचे भाव वाढू नयेत याची प्रमाणिक काळजी घेतली, डिझेल 60 रुपयावरून 100 वर नेले याचा परिणाम शेतकऱ्याच्या आर्थिक नियोजनावर झाला. नांगरट 1200 वरून 2000 भाव झाला शेतात पाळी घालण्यासाठी 400 रुपये एकरी वरून 1000 रुपयांवर गेली, पेरणी 700 वरून 1500 वर गेली, महिलांसाठी गॅस टाकीची योजना आणून प्रत्येक घरामध्ये गॅस टाकी दिली आणि त्याचा भाव 400 वरून 1100 नेला, दैनंदिन जीवनामध्ये जीवनावश्यक लागणाऱ्या वस्तूवर जीएसटी बसवली, सोन्याचा भाव 4000 वरून 7800 वर गेला शेतकऱ्यांना मुला बाळांच्या लग्नामध्ये सोनं घेणं अशक्य झालं हे सरकार शेतकऱ्याच्या बाजूच नसून भांडवलदार लोकांच आहे. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांनी निर्णय घेतला इंडिया महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्यावर मताचा पाऊस पडणार असे शेतकरी नेते गणेश कवडे यांनी सांगितले.



# पंकजाताई मुंडे यांच्या सभेस प्रचंड संख्येने उपस्थित राहावे - संतोष हंगे


**वादळवार्ता/केज** बीड लोकसभा महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ भाजपा नेते संतोष हंगे यांनी दंड थोपटले असून झंजावाती प्रचारासाठी रणांगणात उतरले आहेत. व ३ मे रोजी नांदुरघाट येथे पंकजाताई मुंडे यांची जाहीर सभा होणार आहे. ताईच्या सभेस केज तालुक्यातील मतदार बंधू- भगिणी यांनी मोठ्या संख्येने आपला अमुल्य वेळ काढुन आपली ताकद सिद्ध करावी. लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी जोरात चालू असून महाविकास



आघाडीचे अधिकृत उमेदवार पंकजाताई मुंडे यांचा प्रचार वेगात सुरू आहे त्या निमीत्त भाजपा नेते संतोष दादा हंगे यांनी नांदुरघाट या ठिकाणी सभेचे आयोजन केले आहे नांदूरघाट येथील विश्रामगृह पासून ते सभा स्थळापर्यंत पंकजाताई यांची वाजत गाजत ठिकठिकाणी स्वागत करत रॅली निघेल त्यानंतर ठीक पाच वाजता सभेस सुरुवात होईल तरी केज तालुक्यातील सुजाण मतदार बंधू-भगिणींनी भव्य दिव्य होणाऱ्या विराट जाहीर सभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहून उमेदवाराच्या विजयाचे शिल्पकार व्हावे व या सभेस प्रचंड संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान नांदूर घाट येथील भाजप नेते संतोष दादा हंगे यांनी केले आहे

# यशवंत पाचपुते यांचे निधन

**वादळवार्ता/अंमळनेर**



पाटोदा तालुक्यातील कोतन येथील प्रतिष्ठित शेतकरी यशवंत सावळा पाचपुते यांचे वृद्धपकाळाने वयाच्या ८० व्या वर्षी राहत्या घरी सायंकाळी ४ वाजता निधन झाले.रात्री उशिरा शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यशवंत सावळा पाचपुते हे धार्मिक वृत्तीचे होते.गावातील अखंड हरिनाम सप्ताच्या कार्यक्रमात त्यांचा हिरीरीने सहभाग असायचा.गावातील तंटे गावातच मिटवण्यासाठी त्यांचा नेहमी पुढाकार राहील्याने अनेक वादविवाद पोलीस ठाण्यात जाण्यापुर्वीच गावातच मिटत होते.त्यांच्या पाश्चात्य पत्नी,मुलगा महादेव यशवंता पाचपुते,सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. अंत्यसंस्कारास सरपंच महेश खेंगरे,तसेच ग्रा.प.सदस्य,चेअरमन,नातेवाईक,शेतकरी ,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या निधनाने कोतन परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# शंकरशेठ रोड येथे झाड पडून दोन चारचाकी वाहनांचे नुकसान

**दैनिक वादळ वार्ता पुणे/ पंकज भंडारी**



पुणे शंकरशेठ रोड, मीरा सोसायटी येथे आज सायंकाळी झाड पडून दोन चारचाकी वाहनांचे नुकसान झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी झाड बाजूला करत काम पुर्ण केले. गेल्या सात दिवसात अग्निशमन दलाकडे शहरात झाडपडीच्या २४ वर्धांची नोंद झाली आहे.

# नवरीला ग्रामपंचायतकडून माहेरची साडी भेट, मोखाडा गोमघर ग्रामपंचायतचा अनोखा उपक्रम

**दैनिक वादळ वार्ता**
**पालघर सौरभ/कामडी**

मोखाडा तालुक्यातील गोमघर ग्रामपंचायत मध्ये लग्न होणाऱ्या मुलीला म्हणजेच नवरीला ग्रामपंचायत मार्फत माहेरची साडी भेट म्हणून देण्यात येत आहे.

प्रत्येक कुटुंबाला एक जन्माला आलेली मुलगी म्हणजे लक्ष्मी मानतात त्याचप्रमाणे आदिवासी ची संस्कृती परंपरा हिंदू विवाहात जोपासण्यासाठी साडी परिधान करणे हा पोशाख अत्यंत महत्त्वाचा मानला



जातो कारण विविध क्षेत्रातील महिलांनी तो परिधान केला आहे.हा पोशाख धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये परिधान केला जात नाही,तर साडी परिधान करणे हे महिलांनी खूप वर्षापूर्वी पासून संस्कृती जपत आहेत.येणाऱ्या काळात आता नवनवीन फॅशन चे कपडे येत आहेत आणि ते देखील महिला मोठ्या प्रमाणात वापरताना दिसत आहेत त्यामुळे हा गोमघर ग्रामपंचायत मधील उपक्रम राबविला जात आहे. ग्रामपंचायत च्या सरपंच ,उपसरपंच , ग्रामसेवक व सर्व ग्रामपंचायत सदस्य यांचे या उपक्रमाबद्दल कौतुक होत आहे.आम्ही प्रत्येक मुलीच्या लग्नाला साडी भेट द्यायला जातो त्यावेळेस बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती करत असतो,यामुळे कुपोषण कमी करण्यासाठी फायदा होईल.

-सुलोचना गारे

# परळीत ब्राह्मण सभा आयोजित शानदार सोहळ्यात २१बटुंवर सामुदायिक उपनयन संस्कार




वादळवार्ता/परळी

धर्माचरणाचे संस्कार हे उपनयना सारख्या संस्कारातून होते. त्यामुळे आपले सोळा संस्कार हे धर्मसंमत आहेत. अध्यात्मिक व सांस्कृतिक दृष्ट्या या संस्कारांचे पालन करणे महत्त्वाचे मानले जाते. देव, देश आणि धर्म पालनाचे संस्कार यातून रुजवले जातात. धार्मिकदृष्या तर अनन्यसाधारण महत्त्व असलेले हे संस्कार सांस्कृतिक जडणघडणीत महत्त्वाचे ठरतात असे प्रतिपादन प्रसिद्ध भागवताचार्य, कीर्तनकार भागवतमर्मज्ञ ह.भ.प. बाळुमहाराज उखळीकर यांनी केले. ब्राह्मण बहुद्देशीय सभा आयोजित शानदार सोहळ्यात विविध ठिकाणच्या २१ बटुंवर सामुदायिक उपनयन संस्कार करण्यात आले.

ब्राह्मण समाजाची मध्यवर्ती संस्था असलेल्या ब्राह्मण बहुद्देशीय सभा परळी वै.च्या वतीने आयोजित ४ ४ वा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा आज २९ मे रोजी शानदार व वैभवी स्वरूपात संपन्न झाला. शानदार सोहळ्यात २१ बटुंवर सामुदायिक उपनयन संस्कार करण्यात आले. संत -महंत, मान्यवर व समाज बांधवांची सोहळ्यासाठी मोठी उपस्थिती लाभली. गेल्या ४३ वर्षा पासून ब्राह्मण बहुद्देशीय सभा परळी वै.च्या वतीने अविरतपणे हा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा उपक्रम चालवला जातो. शानदार आयोजन, नियोजनबध्द सोहळा या वैशिष्ट्यामुळे हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रात सुप्रसिद्ध आहे. यावर्षीचा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा सकाळी ११.१२ वा. दर्शन मंडप वैद्यनाथ मंदिर परळी वै. येथे ब्रह्मवृंदाच्या मंत्रोच्चार व विधीपुर्वक संपन्न झाला. या सोहळ्याचे पौरोहित्य मनोहर देव जोशी व ब्रह्मवृंदांनी केले.या सोहळ्यात महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या २१ बटूंवर उपनयन संस्कार करण्यात आले. या वेळी प्रसिद्ध भागवताचार्य,कीर्तनकार भागवतमर्मज्ञ ह.भ.प. बाळुमहाराज उखळीकर यांचे अशिर्वचन झाले. त्याचबरोबर धर्मसंस्कार जीवनाचा पाया असुन हे संस्कार करणारा ब्राह्मण सभेचा उपक्रम अविरत ४४ वर्षांपासुन सुरु ठेवणे हे कौतुकास्पद असुन परळीतील सामुदायिक उपनयन संस्कार सोहळ्यात उपस्थित राहण्याच्या स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या या परंपरेत मला उपस्थित राहता आले हे आनंददायी असल्याची भावना खा.डॉ. प्रीतमताई मुंडे यांनी यावेळी व्यक्त केली. जि.प. गटनेते अजय मुंडे यांनीही या उपक्रमाला दरवर्षी उपस्थित राहत असतो अशा शुभेच्छा व्यक्त केल्या.

हा सोहळा अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.सकाळी मातृका पुजनानंतर सर्व बटूंची प्रभू वैद्यनाथ मंदिर येथे शोभायात्रा काढण्यात आली. सनई चौघडा, मंत्रोच्चार व समाज बांधवांची मोठी उपस्थिती यामुळे मंदिर परिसर दणाणून गेला होता. यावेळी व्यासपीठावर प्रसिद्ध भागवताचार्य,कीर्तनकार भागवतमर्मज्ञ ह.भ.प. बाळुमहाराज उखळीकर , बीडच्या विद्यमान खा.डॉ.प्रीतमताई मुंडे, जि.प.गटनेते अजय मुंडे, वैद्यनाथ देवस्थानचे सचिव प्रा.बाबासाहेब देशमुख, विश्वस्त राजेश देशमुख, डॉ. गुरुप्रसाद देशपांडे, भाजप जेष्ठ नेते दत्ताप्पा इटके, विकासराव डुबे, भाजप शहराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया,वैद्यनाथ बँकेचे चेअरमन विनोद सामत, व्हा.चेअरमन रमेश कराड, दीनदयाळ बॅकेंचे व्हा.चेअरमन ॲड.राजेश्वर देशमुख, संदीप लाहोटी, महेशअप्पा निर्मळे आदींसह मान्यवर उपस्थित होते.

ब्राह्मण बहुद्देशीय सभेचे अध्यक्ष शरदराव कुलकर्णी, सचिव प्रकाश जोशी, कोषाध्यक्ष वासुदेव पाठक, जेष्ठ नेते श्रीकांत मांडे, माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, अरुणराव पुराणिक, नितीन कुलकर्णी, अजय जोशी, सचिन जोशी,चारुदत्त करमाळकर, जितेंद्र नव्हाडे, गिरिश प्रयाग, रत्नाकर कुलकर्णी, विश्वांभर कुलकर्णी, दिपक जोशी, दिनेश लोंढे,ऋषी पौळ, अनंत कुलकर्णी, प्रशांत रामदासी आदींनी मान्यवरांचा सत्कार केला.

समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. रविंद्र जोशी यांनी केले. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी ब्राह्मण बहुद्देशीय सभा, स्वा. वी. दा.सावरकर प्रबोधिनी, पेशवा युवा संघटन, ब्राह्मण महिला आघाडी, ब्राह्मण युवक संघटना,पुरोहित संघटना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )